आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२८ फेब्रुवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं यासाठीच्या देशव्यापी मोफत लसीकरण मोहिमेला सुरुवात

- अजित पवार यांचं विमान झाडांना आदळल्यानंतर बारामतीच्या धावपट्टीवर कोसळल्याचा प्राथमिक अहवाल

- आंध्रप्रदेशात फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत २१ जणांचा मृत्यू, ८ जखमी

- अमेरिका आणि इस्राइलनं इराणवर केलेल्या हल्ल्यात ६१ नागरिकांचा मृत्यू, सर्व देशांचं सार्वभौमत्व आणि भौगोलिक सीमारेषांचा आदर करण्याचं भारताचं आवाहन

**आणि**

- जम्मू आणि काश्मीरच्या क्रिकेट संघानं पहिल्यांदाच जिंकला रणजी करंडक

**<><><><><>**

एचपीव्ही लसीकरणाच्या देशव्यापी मोहिमेचा प्रारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज राजस्थानात अजमेर इथं झाला. गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं याकरता १४ वर्ष वयाच्या मुलींना ही लस देण्यात येणार आहे. दरवर्षी १ कोटी १५ लाख मुलींना लस देण्याचं मोहिमेचं उद्दिष्ट आहे. सर्व सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये ही लस मोफत दिली जाणार असून हे लसीकरण ऐच्छिक आहे. यावेळी प्रधानमंत्री म्हणाले

होल्ड- बाईट प्रधानमंत्री

**<><><><><>**

राज्यात कापूस खरेदीची मुदत १५ मार्च पर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती सरकारने आज विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. मुदत वाढवण्याचा प्रस्ताव पणन विभागाने केंद्र सरकारकडे पाठवला होता, त्यानुसार केंद्र सरकारने याला परवानगी दिली आहे. प्रति एकर उत्पादकतेच्या आधारे खरेदीची मर्यादा ठरवली जाणार आहे. यासह हरभरा खरेदी ५ हजार ८८५ रुपये प्रति क्विंटल हमीभावाने उद्यापासून सुरू करण्यात येईल.

**<><><><><>**

२०२५ या वर्षात राज्यात राहणाऱ्या २ हजार ३७६ अवैध बांगलादेशी घुसखोरांना हद्दपार केल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानपरिषदेत दिली. राज्यात पहिल्यांदाच डिटेन्शन सेंटर उभारण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असंही कदम यांनी सांगितलं.

**<><><><><>**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान झाडांना आदळून त्यानंतर बारामतीच्या धावपट्टीवर अपघातग्रस्त झाल्याचं हवाई अपघात तपास संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे. हा अहवाल आज प्रसिद्ध झालं. अपघातानंतर विमानानं पेट घेतला आणि त्यात संपूर्ण कॉकपिट आणि केबिन जळून खाक झालं. विमानातले दोन्ही रेकॉर्डर्सही आगीच्या तडाख्यात सापडले, त्यामुळे त्यांच्यातला डेटा मिळवण्यासाठी विशेष तंत्र वापरावं लागलं, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. यापैकी एसएसएफडीआर या रेकॉर्डरमधला रॉ डेटा डाऊनलोड करण्यात यश आल्याचं अहवालात सांगितलं आहे.

<><><><><>

एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवासासाठी सध्या NCMC स्मार्ट कार्डची सक्ती केली जाणार नाही असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे. जोपर्यंत ८० टक्के सवलत धारक प्रवाशांची स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत कार्ड अनिवार्य केलं जाणार नाही, असं एसटी महामंडळानं स्पष्ट केलं आहे. आतापर्यंत सुमारे १ लाख नागरिकांनी हे कार्ड घेतलं आहे.

<><><><><>

आंध्र प्रदेशातल्या काकीनाडा जिल्ह्यात आज एका फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात २१ जणांचा मृत्यू झाला तर आठ  जण गंभीर जखमी झाले. आंध्र प्रदेशच्या गृहमंत्री वंगालपुडी अनिथा यांनी ही माहिती दिली. समरलाकोटा इथल्या वेतलापलम गावात झालेल्या या स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, काही मृतदेह बाजूच्या शेतापर्यंत फेकले गेले, असं पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं. बचाव कार्य आणि मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल समाजमाध्यमातील पोस्ट द्वारे शोक व्यक्त केला. मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांच्या नुकसानभरपाईची त्यांनी घोषणा केली.

<><><><><>

भारतात आयोजित ए आय इम्पॅक्ट परिषदेने जगाला भारताच्या ए आय क्षमतेची ओळख करून दिल्याचं प्रतिपादन  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज गुजरातमध्ये साणंद इथं मायक्रॉन सेमीकंडक्टर टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड इथं सेमीकंडक्टर जुळवणी, चाचणी आणि पॅकेजिंग सुविधेचं उदघाटन केल्यानंतर आयोजित मेळाव्यात बोलत होते. यामुळे, भारताच्या पहिल्या

व्यावसायिक सेमीकंडक्टर उत्पादनाची सुरुवात होणार आहे. गेल्या शतकावर तेल उद्योगाचं नियंत्रण असलं तरी चालू शतक मायक्रोचिपच्या प्रभावाखाली असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्त्रायलनं आज संयुक्तपणे इराणवर लष्करी हल्ला केला. याची झळ इतर आखाती देशांनाही बसली आहे. अमेरिका आणि इस्त्राइलनं इराणमधल्या मिनाब शहरातल्या मुलींच्या शाळेवर केलेल्या हल्ल्यात ५६ शालेय विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आणि ६० जण जखमी झाले.  याच शहरात इराणच्या निमलष्करी दलाचा तळ आहे. मुलींच्या शाळेवर झालेल्या हल्ल्याचा योग्य प्रतिकार केला जाईल अशा इशारा इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची यांनी दिला आहे. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात सीरियातल्या स्वेदा शहरात ४ जणांचा मृत्यू झाला आणि काही जण जखमी झाले. इराणच्या हल्ल्यात अबुधाबीत एका नागरिकाचा मृत्यू झाला आहे. अमेरिका आणि इस्त्राइलनं तेहरानवर अनेक क्षेपणास्त्र डागली. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या कार्यालयाजवळही हल्ले झाले. या हल्ल्यानंतर काही तासांनी इराणनं इस्त्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र डागत प्रतिहल्ला चढवला. अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेला सध्याच्या इराणमधल्या सत्तेपासून धोका असल्यामुळे अमेरिकेच्या लष्करानं ही मोठी मोहीम सुरू केली आहे, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यांनी सांगितलं. जेव्हा युद्ध संपेल, तेव्हा तुमचं सरकार तुम्ही सांभाळा. ही तुमच्या अनेक पिढ्यांना मिळणारी कदाचित एकमेव संधी असेल, असं ट्रम्प इराणच्या नागरिकांना उद्देशून म्हणाले. या हल्ल्यानंतर एअर इंडिया, इंडिगोसह जगभरातल्या अनेक विमान कंपन्यांनी आखाती देशातली हवाई सेवा रद्द केली आहे.

<><><><><>

सर्व देशांचं सार्वभौमत्व आणि भौगोलिक सीमारेषांचा आदर झाला पाहिजे असं म्हणत भारतानं या संघर्षाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. संवादाच्या माध्यमातून तणाव दूर करावा असं भारतानं म्हटलं आहे. युद्धजन्य देशातल्या भारतीय नागरिकांना भारतानं दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनीनं अमेरिका आणि इराणमधल्या चर्चा पुन्हा सुरू व्हाव्या अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. इराणनं केलेल्या हल्ल्यांचाही या देशांनी निषेध केला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची आपात्कालीन बैठक बोलवली जाईल अशी मागणी फ्रान्सचे अध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यांनी केली. पाकिस्तानसह अनेक देशांनी अमेरिका आणि इस्त्राइलच्या या हल्ल्याचा निषेध केला आहे.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरच्या क्रिकेट संघानं ६७ वर्षांची प्रतिक्षा संपवत पहिल्यांदाच रणजी करंडक पटकावला. आज हुबळी इथं झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी आठ वेळा रणजी विजेतेपद पटकावलेल्या कर्नाटकच्या संघावर मोठी आघाडी घेत त्यांचा पराभव केला. पहिल्या डावात मिळवलेल्या २९१ धावांच्या आघाडीसह दुसऱ्या डावात ४ बाद ३४२ धावांची मोठी आघाडी घेत जम्मू आणि काश्मीरनं विजय मिळवला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्यासह विविध मान्यवरांनी जम्मू आणि काश्मीरच्या क्रिकेट संघाला शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी संघाला २ कोटी रुपयांचं पारितोषिक जाहीर केलं आहे.

<><><><><>

देशातल्या बहुतांश भागात मार्च ते मे महिन्यादरम्यान उष्णतेच्या लाटेचे सरासरीपेक्षा जास्त दिवस अनुभवायला मिळणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. भारतीय हवामान खात्यानं आज प्रसिद्ध केलेल्या मासिक अंदाजात ही माहिती दिली आहे. दक्षिण आणि पूर्व महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये उष्णतेची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज श्रीलंका आणि पाकिस्तान संघात सुपर-८ फेरीतला सामना सुरू आहे. श्रीलंकेतल्या पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून श्रीलंकेनं प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त आलं तेव्हा पाकिस्ताननं १५ व्या षटकांत बिन बाद १५६ धावा केल्या होत्या.

हा सामना पाकिस्तानसाठी उपांत्य फेरी गाठण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. भारताचा पुढचा सामना उद्या वेस्ट इंडिजविरुद्ध कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर होणार आहे. या सामन्याचा निकाल भारताचं स्पर्धेतं भवितव्य ठरेल. स्पर्धेचे उपांत्य सामने ४ आणि ५ मार्चला खेळले जातील तर अंतिम सामना ८ मार्च रोजी होणार आहे.

**//<><><><><>//**